फ.7 25

# बृहन्मुंबई महानगरपालिका

17 APR 2015

## परिपत्रक क्र. कवसं / 01 / सं / प्र.अ.(सां) /15-16

विषय: दरमहा मालमत्ता कर समस्या निवारण सप्ताह सुरु करण्याबाबत.

संदर्भ: क्र. अति आयुक्त (प्र)/5839/ दि. 02.03.2015.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये दि.01.04.2010 च्या प्रभाव्य दिनांकापासून जानेवारी 2013 मध्ये मालमत्ताकर आकारणीची भांडवली मूल्याधारीत करप्रणाली अंमलात आली.

सदर करप्रणाली अंमलात आल्यानंतर वेळोवेळी जनजागृतीसाठी विविध वृत्तपत्रातून, चर्चासत्रातून नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. तसेच 2014 मध्ये 24 विभाग कार्यालयातून "मालमत्ता कर तक्रार निवारण सप्ताह" राबविण्यात आला. तसेच दि. 01.04.2015 पासून मालमत्तांचे भांडवली मूल्य सुधारीत होऊन प्रत्येक मालमत्तेचा कर हा दि. 31.03.2015 रोजी असणा-या कराच्या 40% कमाल मर्यादेपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त करप्रणाली बाबतच्या नागरिकांच्या मनातील शंका, आकस दूर करण्याचा प्रयत्न करण्याच्या हेतूने व तक्रारींचा त्वरीत निपटारा व्हावा याकरिता सन 2015-16 वर्षामध्ये मालमत्ता कर तक्रार निवारण सप्ताह नियमित दरमहा राबविण्याकरिता अति. आयुक्त (प्र) यांची अति. आयुक्त (प्र) /5839/दि. 02.03.2015 अन्वये आदेश प्राप्त झाले आहेत.

तरी सर्व विभाग कार्यालयाने या परिपत्रकान्वये खाली नमूद केलेले तक्रारींचे विषय अंतर्भूत करून "मालमत्ता कर तक्रार निवारण सप्ताह" राबविण्यात यावा. व त्यानुसार नागरिकांचे शंका निरसन व त्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यात यावा. सोबत जोडण्यात आलेल्या तक्त्यानुसार तक्रार निवारण सप्ताहाचा अहवाल अति. आयुक्त (प्र) यांच्या माहितीकरिता सादर करण्यात येणार असल्याने सदर अहवाल दरमहा सप्ताहानंतर 3 दिवसांत प्रशासकीय अधिकारी (सांख्यिकी) विभागात न चुकता (without fail) aostatsho@gmail.com या ई-मेल व्दारे पाठविण्यात यावा.

सप्ताहादरम्यान खालील विषयांच्या तक्रारी दाखल करुन घेण्यात येतील:

परतावा, पुनःकरनिर्धारण (Reassessment), नविन करनिर्धारण (New Assessment) तक्रारी(Complaints), थकित देयके (OSM), Work flow for concession, Change in Name & Address, flat wise Bills इ. व नविन करप्रणालीच्या अनुषंगाने उद्भवणारे विषय व इतर.

D:\Sangita\general correspondence\मालमत्ता कर सप्ताह.docx

मालमत्ता कर तक्रार निवारण सप्ताह राबवितांना सर्व विभाग कार्यालयाने सदर सप्ताहापूर्वी नागरी सुविधा केंद्र, मुख्य प्रवेशद्वार, तसेच कार्यालयाच्या दर्शनी भागात सदर कार्यक्रमाचे फलक लावून जगजागृती करावी.

<u>मालमत्ता कर समस्या निवारण सप्ताहाचे वेळापत्रक:</u>

पूर्व उपनगरे – महिन्याचा पहिला आठवडा

पश्चिम उपनगरे – महिन्याचा दुसरा आठवडा

शहर विभाग – महिन्याचा तिसरा आठवडा

माननीय अति. आयुक्तांच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. यात दिरंगाई अथवा अनास्था निदर्शनास आल्यास संबंधीत विभाग प्रमुखावर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करनिर्धारक व संकलक (प्र)

17 APR 2015

प्रत रवाना :-

सहा. करनिर्धारक व संकलक पु ते टी विभाग

परिपत्रक माहितीकरिता व पुढील आवश्यक

कार्यवाही करिता.

17/4/15

उपकरनिर्धारक व संकलक (प्रशा)